**-: प्रेस नोट :-** **दिनांक :- २७/०५/२०२६**

# पवई पोलीस ठाणे, मुंबई येथील खुनाचा गुन्हा कक्ष १०, गुप्रशा, गुअवि, मुंबई यांनी उघडकीस आणलेबाबत

**--------------------**

दिनांक ०७/०५/२०२६ रोजी पवई पोलीस ठाणे गु.र.क्र. ५८९/२०२६ कलम १०३(१) बी.एन.एस. अन्वये फिर्यादी नामे विजय अरुण घाडगे वय वर्षे ३८ धंदा- नोकरी (पोलीस शिपाई क्रमांक ११३००६ नेमणूक पवई पोलीस ठाणे) राठी यांचे फिर्यादीवरून खूनाचा गुन्हा दिनांक २४/०५/२०२६ रोजी २०.३० वा. दाखल करण्यात आला होता.

पवई पोलीस ठाणे हद्दीतील लोढा सुप्रीमस आऊट गेट, तुंगा गाव, साकी विहार रोड, पवई, मुंबई या ठिकाणी इसम नामे युसुफ वय ५५ वर्षे (पूर्ण नाव माहित नाही) याचा कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी धारदार शस्त्राने छातीच्या डाव्या बाजूस वार करून जखमी करून खून केला होता. नमूद गुन्हा दाखल झाल्यानंतर कक्ष १०, गुप्रशा, गुअवि मुंबई च्या पथकाने तात्काळ घटनास्थळी भेट देऊन विविध तपास पथके तयार केली. नमुद पथकांनी आरोपी गुन्हा करण्यापूर्वी कोठून आले व गुन्हा केल्यानंतर कोठे पळून गेले याबाबत घटनास्थळाचे तसेच आजूबाजूचे १०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. प्राप्त सिसीटीव्ही फुटेज व केलेल्या तांत्रिक तपासावरून आरोपी निष्पन्न करून नमूद आरोपी हा पुष्पक नगर राजस्थानी स्कूल जवळ, जीआईडीसी, सुरत, गुजरात येथे असल्याचे निष्पन्न झाल्याने कक्ष १०, गुप्रशा, गुअवि मुंबई चे पथक नमूद ठिकाणी रवाना करण्यात आले. नमूद पथकाने नमुद आरोपीस वरील नमूद ठिकाणाहून ताब्यात घेतले असून त्याच्याकडे केलेल्या चौकशीमध्ये त्याने एक आठवड्यापूर्वी झालेल्या वादाचा राग मनात मनात ठेवून सदरचा खून केल्याचे कबूल केले असून सदर आरोपीस पुढील कायदेशीर कारवाई कामी पवई पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आलेले आहे.

**आरोपीचे नाव व पत्ता :-** दीपक उर्फ दीपु नथूप्रसाद वर्मा वय २६ वर्ष रा. ठी शिवम स्कूल जवळ, तुंगा गाव, पवई, मुंबई, गावचा पत्ता लौली टिका माउ, पोलीस स्टेशन बिसंडा, ता. बबेरू, जि. बांदा उ. प्र.

सदरची कारवाई ही **मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१) श्री. नवनाथ ढवळे , व मा.सहा.पो.आयुक्त (डी पश्चिम) सदानंद राणे यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष १०, गुप्रशा, गुअवि मुंबई चे प्रभारी पोलीस निरीक्षक विशाल राजे, सपोनि गणेश तोडकर, सपोनि पुनम यादव, सपोनि अश्विनी रायबोले, सपोनि योगेश जाधव पोउनि संदेश इंगळे, सपोनि संग्राम पाटील (कक्ष ८), सफौ. धारगळकर, पोह माने, पोह धनवडे, पोह जगताप, पोह मोरे, पोह जाधव, पोलीस अंमलदार डफळे, निकम, मांडवे, निर्मळे आणि पोअंचा शिंदे तसेच पोह संग्राम अतिग्रे व पो.ह राहुल सकट (कक्ष ८)** या पथकाने पार पाडली आहे.

